# प्रकरण - ३

# मार्गदर्शक संच पद्धती

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

# प्रकरण - ३

# मार्गदर्शक संच पद्धती

## ३.१ प्रस्तावना

शिक्षण ही निरंतर, सहजपणे चालणारी प्रक्रिया आहे. औपचारिक शिक्षण हे त्या प्रक्रियेचे अंग आहे. औपचारिक शिक्षणात अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन या महत्त्वाच्या प्रक्रिया आहेत. अध्ययन हे विद्यार्थ्यांनी करावयाचे तर अध्यापन ही कृती अध्यापकाने करावयाची आहे. मूल्यमापन तज्ज्ञांनी किंवा अध्यापकाने करावे. अध्यापकाने काय अध्यापन केले, मुलांनी ते कितपत ग्रहण केले, ग्रहण केलेल्या पैकी विद्यार्थी नेमके किती आत्मसात करून अंगी बाणवितो हे मूल्यमापनावरून लक्षात येते. त्यामुळेच प्रथम बारकाईने अभ्यास करून त्यातून अध्यापन विचार दृढ केले. विद्यार्थ्यांची विचार प्रक्रिया विकसित करण्यासाठी अध्यापन केले जाते.

## ३.२ अध्यापन प्रक्रिया

शिक्षणाच्या प्रक्रियांचा विचार केला असता पुढील तीन पायऱ्यांचा विचार केला जातो.

१) अध्यापन पूर्व पायरी (Pre-active Stage)

२) प्रत्यक्ष अध्यापन पायरी (Interactive Stage)

३) अध्यापनोत्तर पायरी (Post-active Stage)

**१) अध्यापन पूर्व पायरी** वर्गात प्रत्यक्ष अध्यापनाला जाण्यापूर्वी अध्यापकाला अनेक बाबी कराव्या लागतात. पाठ्यांशाचा आशय कोणता ? तो कसा शिकवावा. तो शिकविताना कोणते अध्ययन अनुभव द्यावेत, कोणती साधने वापरावीत इ. चे नियोजन करावे लागते. अध्यापनपूर्व पायरीमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

१) उद्दिष्टे निश्चित करणे.

२) पाठ्यवस्तू निश्चित करणे.

३) पाठ्यवस्तूच्या सादरीकरणासाठी आवश्यक त्या साधनासंबंधी व मार्गासंबंधी निर्णय घेणे.

४) पाठ्यवस्तूच्या सादरीकरणासाठी समर्पक युक्त्या व प्रयुक्त्या निश्चित करणे.

५) उद्दिष्ट प्राप्ती झाली की नाही हे पाहण्यासाठी मूल्यमापनाची साधने व तंत्रे निश्चित करणे.

वरील बाबींचे नियोजन केल्यास अध्यापकाला आपल्या अध्यापनावर प्रभुत्व मिळविता येते. आपला प्रभाव पाडता येतो. वरील बाबींचे नियोजन केले नाही तर अध्यापकास आपला प्रभाव योग्यरित्या पाडता येणार नाही. म्हणजेच अध्यापन पूर्व अवस्थेमध्ये अध्यापन नियोजनाचा भाग येतो.

२) **प्रत्यक्ष अध्यापन पायरी** अध्यापकाने वर्गात प्रवेश केल्यानंतर वर्गात नजर फिरवून विद्यार्थी काय करीत आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. अध्यापनाला सुरवात करण्यापूर्वी अध्यापकाने विद्यार्थ्यांचे लक्ष आपल्याकडे केंद्रित करून घेतले पाहिजे.

या पायरीमध्ये अध्यापकाने उपघटकांचे चर्चात्मक विश्लेषण करणे गरजेचे असते. प्रत्यक्ष अध्यापन करताना अध्यापक-विद्यार्थी चर्चात्मक आंतरक्रिया घडून येते.

वर्गात अध्यापन करताना विद्यार्थी प्रतिसादावरून अध्यापक अध्यापनामध्ये आपल्या निर्णयामध्ये विद्यार्थी चर्चेत मध्ये बदल करतो. त्याचबरोबर आपल्या अध्यापनात पर्यायी प्रणालीचा वापर करतो. अध्यापन चालू असतानाच अध्यापक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतात त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना अध्यापनाच्या चर्चेत सहभागी करून घेतात. उलटसुलट प्रश्नांच्या साहाय्याने अध्यापक-विद्यार्थीमध्ये चर्चा घडून येते. त्याचप्रमाणे अध्यापक विद्यार्थ्यांना चर्चेसाठी मुद्दे देऊन त्यांच्यात उपघटकासंबंधी चर्चा घडवून आणतात. त्यांच्या विचारांना चालना देतात.

अध्यापक अध्यापनाचे मुद्दे धरून नवीन मुद्दे तयार करतात. त्यांचे अनुमान व तर्क करतात. विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करून व्याख्या तयार करतात. या सर्व कृती करीत असतानाच महत्त्वाचे मुद्दे फलकावर लिहित असतात.

यासर्व क्रिया करीत असताना अध्यापक आपण जी पाठ्यवस्तू शिकविणार आहोत ती समजून घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांकडे आहे का? तसेच आवश्यक अशी अभिरूची आहे का ? योग्य दृष्टिकोण आहे का ? या बाबींचे प्रश्न विचारून निदान करतात.

प्रत्यक्ष अध्यापनामध्ये उद्दीपकाची निवड योग्यरित्या करावी लागते त्याचप्रमाणे निवडलेल्या उद्दीपकांचे सादरीकरण करताना प्रत्याभरणावर भर दिला पाहिजे.

अध्यापन विषयक निर्णय Shavelon यांनी १९७३ मध्ये मांडला. त्यांनी शिक्षकांकडे उपलब्ध असलेल्या गुंतागुंतीच्या बोधात्मक संरचनेमधून अध्यापक विषयक निर्णय घेतले. मूलभूत अध्यापन म्हणजे विविध प्रकारचे निर्णय घेणे असे मत व्यक्त केले.

अध्यापन विषयक शिक्षकाचे प्रतिक्रियात्मक विचार नेहमी अध्यापन विषयाशी निगडीत म्हणजेच Task Orianted असतात.

"Task relevant thinking" म्हणजेच समस्या संबंधी विचार प्रक्रिया यालाच Interactive Decisions म्हणतात.

१९७७ मध्ये Marland यांनी प्रत्यक्ष अध्यापनाविषयी तीन महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत मत व्यक्त केले आहे.

१) अध्यापनातील संभाव्य पर्यायांचा विचार.

२) एका पर्यायाची निवड करून अध्यापक समर्थन करतो.

३) संपूर्ण पाठामध्ये अध्यापक त्याच पर्यायाचा अवलंब करतो.

अध्यापकाचे अध्यापन सुरू असताना शिक्षकांची काही वेळा द्विधा मन:स्थिती निर्माण होते. अशावेळी विद्यार्थी शिक्षक अध्यापन चालू असतानाच शंका विचारतात. शंकांचे निरसन करण्यासाठी अध्यापकास अध्यापनाची दिशा बदलावी लागते. या देवाणघेवाणी मधून विद्यार्थी शिक्षक अधिकाधिक अध्यापनाकडे लक्ष केंद्रित करतात. त्यामुळेच अध्यापकास अध्यापन करताना विद्यार्थी शिक्षकांना प्रेरणा देता येते. विद्यार्थी-शिक्षकांमधील जिज्ञासावृत्ती, चौकसबुद्धी, क्रियाशीलता यांना वाव देता आला. विद्यार्थी शिक्षकांची वैचारिक पातळी वाढविण्यासाठी प्रोत्साहन देऊन अवधान व अभिरूची जोपासण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी विद्यार्थी शिक्षकांना विचारप्रवर्तक प्रश्न विचारावे लागतात. चांगला अध्यापक कमीतकमी बोलतो व अधिकाधिक अध्यापन करतो, शिकवितो. आणि हाच प्रयत्न अध्यापकास या पायरीमध्ये करावा लागतो.

प्रत्यक्ष अध्यापन करताना अध्यापकाने मार्गदर्शक, सल्लागार, मदतनीस, मित्र, तत्त्वज्ञ अशी भूमिका घ्यावी लागते. विद्यार्थी शिक्षकांना आयते ज्ञान न देता त्यांना त्यावर विचार करायला लावला त्यामुळेच विद्यार्थी शिक्षक अध्यापनात स्वत:हून बोलके होत होते.

३) **अध्यापनोत्तर पायरी** अध्यापनाची ही मूल्यमापन अवस्था होय. वर्गात केवळ अध्यापन करून काम भागत नाही तर आपण पाठ्यांशाचे केलेले अध्यापन विद्यार्थी शिक्षकांना कितपत समजले आहे त्याचप्रमाणे अध्यापनामधील चर्चेत ते कितपत सहभागी झाले आहेत हे समजते. अध्यापकास आपले अध्यापन योग्य कि अयोग्य याचे मूल्यमापन करून त्यावरून नवीन अध्ययन प्रसंग निर्माण करून प्रत्याभारणाद्वारे अध्यापन करता

येते. अध्यापनामध्ये जो अपेक्षित वर्तन बदल ग्रहित धरला होता तो साध्य झाला कि नाही हे पाहता येते. जे उद्दिष्ट समोर ठेऊन अध्यापन केलेले असते त्याचे मापन करण्यासाठी समर्पक साधनाची निवड करावी लागते. संशोधकाने यासाठी पाठ्यांश अध्यापनानंतर लगेच चाचणी घेतली आहे. या चाचणीद्वारे संबंधित पाठ्यांशाचे मूल्यमापन केले. चाचणी ही वस्तूनिष्ठ प्रकारची होती. चाचणीमध्ये ज्ञान, आकलन, उपयोजन इ. उद्दिष्टांचा समावेश केलेला होता. चाचणी तयार करताना प्रत्येक वेळी प्रश्न प्रकारामध्ये बदल करण्याचा प्रयत्न केला. रिकाम्या जागा भरा. पर्यायी शब्द शोधा, एका वाक्यात उत्तरे लिहा, जोड्या जुळवा, चूक-बरोबर, सत्य-असत्य, नियम सांगा, दोन-चार ओळीत उत्तरे लिहा इ. प्रश्न प्रकारांचा समावेश केला. प्रत्येक चाचणी ही १५ गुणांची होती.

चाचणी मधून मिळालेल्या प्रतिसादानुसार अध्यापनाची दिशा बदलावी कि नाही यासंबंधी निर्णय घेतला.

वरील तीन अध्यापनाच्या पायऱ्यांचा आधार मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये घ्यावाच लागतो. अध्यापकाने चांगले अध्यापन करावे ही नेहमीच अपेक्षा असते. त्यामुळे अध्यापकाने मार्गदर्शक संच पद्धतीचा वापर करून वरील पायऱ्यांचा समावेश आपल्या अध्यापनात करावा.

अध्यापन करताना पुढील पायऱ्यांचाही विचार करावा लागतो.

१) **शिक्षकाचे अपेक्षित वर्तन** अध्यापक अध्यापन करीत असताना विद्यार्थी शिक्षकाचे वर्तन अध्ययनासाठी अनुकूल असणे अशी अपेक्षा असते त्याचप्रमाणे अध्यापन करीत असताना अध्यापकाने कोणती कृती करावी, ती कितपत करावी, त्याचा क्रम कसा असावा इ. बाबी लक्षात घ्याव्यात यावरूनच अध्यापन कसे झाले हे समजते. मार्गदर्शक संचाचा वापर करताना अध्यापकास मर्मदृष्टी प्राप्त होते. अध्यापनाच्या मूल्यमापनामुळे अध्यापकास अध्यापन-उद्दिष्टे कितपत साध्य करू शकतो याची माहिती मिळते व त्यावरून त्यास आपल्या अध्यापन वर्तनात बदल करून अपेक्षित वर्तन बदल करणे भाग असते, गरजेचे असते.

२) **विद्यार्थ्यांचे अपेक्षित वर्तन** अध्यापन मापनामध्ये विद्यार्थ्यांच्या वर्तनात अपेक्षित वर्तन बदल अपेक्षित असतो. पूर्वी विद्यार्थी वर्तन बदल हे शिक्षकाच्या वर्तन बदलाशी निगडीत करून त्याचे निरीक्षण केले जात होते. अध्ययन प्रभावी होण्यासाठी मार्गदर्शनपर अध्यापनाची गरज असून त्यावरच अध्ययनाची सफलता अवलंबून असते. विद्यार्थी शिक्षकांवर आवडी निवडीचे, गरजेचे, विकासाच्या क्षमतेचे आकलन मार्गदर्शक संच पद्धतीने करता येते.

३) **पूरक साहित्याचा वापर** अध्यापन करताना आपण पाठ्यांशाची पुरक अशा शैक्षणिक साधनांचा वापर करता येतो. पुरक साहित्याच्या वापरामुळे अध्यापन प्रभावी करता येते. अध्यापन करताना पाठ्यांशानुसार ओव्हरहेड प्रोजेक्टर, विविध आकृत्या, संदर्भ ग्रंथ, तक्ते इ. साधनांचा वापर करता येतो.

**४) विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन स्वाध्याय** स्वयंअध्ययन स्वाध्यायामुळे विद्यार्थी शिक्षकांना शिक्षणाच्या जबाबदारीची जाणीव होते. मार्गदर्शक संच पद्धतीने अध्यापन केल्यास स्वयंअध्ययनाची सवय विद्यार्थी शिक्षकांना लागते. अध्यापनानंतर लगेच त्याच पाठ्यांशावर चाचणी दिली जाते.

**५) मूल्यमापन पद्धती** कोणतीही कृती, काम केले असता ते कितपत चांगले झाले हे जाणून घेण्याची इच्छा प्रत्येकाला असते. अध्ययन-अध्यापन ही जाणीवपूर्वक व विशिष्ट उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेऊन केलेली कृती असल्याने अध्यापनानंतर अध्ययन कितपत घडून आले हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे व आवश्यक आहे. यालाच मूल्यमापन म्हणतात.

मार्गदर्शक संच पद्धतीने अध्यापन करताना त्याच तासिकेला झालेल्या पाठ्यांशाचे विद्यार्थ्यांनी कितपत अध्ययन केले हे मूल्यमापनातून कळते. अध्यापनामध्ये मूल्यमापन करणे महत्त्वाचे असते. मूल्यमापनामुळे विद्यार्थ्यांची प्रगती समजते. आजच्या विद्यार्थी केंद्रीत शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांची कुवत, गरज, वय, भिन्नता, स्वतंत्र विचार करण्याची पात्रता, कृती, स्वातंत्र्य यावर भर दिला जातो. त्यामुळे त्यांच्यात नवी दृष्टी निर्माण होते. परीक्षांचे चक्र, साचेबंद अभ्यासक्रम हे विद्यार्थ्यांच्या स्वातंत्र्याच्या मार्गातील प्रमुख शत्रू आहेत.

मार्गदर्शक संच पद्धतीचा वापर करून अध्ययन-अध्यापन केल्यास विद्यार्थी शिक्षकांच्या विचार प्रक्रियेला वाव मिळतो. आजचा शिक्षक हा विद्यार्थ्यांचा सहाय्यक, मित्र, मार्गदर्शक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जरूर तेथे मार्गदर्शन होते. मार्गदर्शक संच पद्धतीमुळे विद्यार्थी शिक्षकांना विचार करायला लागतो.

## ३.३ मार्गदर्शक संच पद्धतीमुळे कृतीमधून शिक्षण

मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये अध्यापकाने अध्यापन करीत असताना विद्यार्थ्यांना चर्चेत सहभागी करून घ्यावयाचे असते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना चर्चेत भाग घ्यावा लागतो. त्यावर विचार करावा लागतो. इतर पद्धतीमध्ये साधारणात: ऐकण्याची क्रियाच करावी लागते. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये विद्यार्थी शिक्षकांना अध्ययन करताना चर्चेत सहभागी व्हावे लागते त्यामुळे त्यांना स्वप्रयत्नाने ज्ञान मिळण्यास उत्तेजन मिळते. स्वप्रयत्नाने मळविलेले ज्ञान हेच खरे ज्ञान असते.

जीवनामध्ये सामाजिक व वैयक्तिक गरजा भागविताना मार्गदर्शक संच पद्धतीने अध्यापन करता येते.

## ३.४ मार्गदर्शक संचाची तात्विक भूमिका

विद्यार्थी शिक्षकांनी स्वत: प्रत्येक पाठ्यांशाचे अध्यापनात, चर्चेत विचारपूर्वक सहभागी होऊन योग्य मते मांडण्याचा प्रयत्न करावा. अध्यापक अध्यापनात वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करतो त्याप्रमाणे त्याने मार्गदर्शक संच पद्धतीचा अध्यापनात वापर करावा.

मार्गदर्शक संचाची संकल्पना, पाठपद्धती, पाठनियोजन इत्यादी प्रकरण ३ मध्ये स्वतंत्र दिली आहेत.


वर्गात अध्यापनाला जाण्यापूर्वी अध्यापकाला करावा लागणारा विचार, नियोजन आणि निर्णय घ्यावे लागतात. म्हणजेच विचार, आराखडा, निर्णय हे शिक्षकाच्या अध्यापनाचे एक भागच होत.

Thinking, planning and decision making of teachers constitute a large part of the psychological context of teaching. अध्यापकाचे वर्तन त्याच्या विचार प्रक्रियेनुसार ठरते. आपल्या विचार प्रक्रियेत अध्यापक विचार, निर्णय, अंदाज, योग्य उपपत्ती इ. चा विचार घेतो.

शिक्षकाच्या कृती भौतिक रचना, बाह्यघटक प्रभाव, शाळा, प्राचार्य, अनुदान, अभ्यासक्रम इ. नुसार नियंत्रित होतात. शिक्षकाच्या कृती त्याच्या विचार प्रक्रियेतून साकार होतात. शिक्षक कृती व त्याची विचार प्रक्रिया एकत्र आणली पाहिजे तरच शिक्षण प्रक्रिया आपल्याला समजेल.

नियोजनासारख्या कृतीत शिक्षक आपले विचार शब्दबद्ध करतात. असे नियोजन टेपच्या साहाय्याने संकलित करावेत. ते संबंधित शिक्षकास दाखवून त्याच्या विचार प्रक्रियेसंबंधी प्रश्न विचारता येतात. शिक्षकांनी स्वत:ची डायरी ठेवावी त्यामध्ये नोंदी कराव्यात. पाठ्यांशाचे कोणत्या घटकासाठी नियोजन केले आहे, वर्गामधील पाठनियोजन कृतीत आणल्यानंतर त्याबाबत प्रतिक्रिया व पाठनियोजनाचे मूल्यमापन याची नोंद ठेवावी. शिक्षकाने जी कृती निवडली ती का निवडली याचे समर्थन करावे. या नोंदीचा पाठ्यांशाचे विश्लेषण करणे, तत्त्वे तयार करणे, नियोजन प्रक्रियेचे नमुने तयार करण्यासाठी उपयोग करावा.

A Model of Teacher's Thought and Action




शिक्षक विचार प्रक्रिया

शिक्षकाच्या कृती व त्यांचे निरीक्षणक्षम परिणाम

शिक्षक विचार प्रक्रिया आणि शिक्षकाच्या कृती या क्षेत्रामध्ये मूलभूत फरक आहे. पहिला फरक म्हणजे शिक्षक विचार प्रक्रिया डोक्यात चालू असते, त्याचे निरीक्षण करता येत नाही. दुसरा फरक म्हणजे शिक्षकाच्या कृती व त्याचे निरीक्षणक्षम परिणाम क्षेत्रातील शिक्षक वर्तन, विद्यार्थी वर्तन, विद्यार्थ्यांचे प्राविण्य गुणांक या निरीक्षण परिस्थितीचे मापन करणे सोपे असते. शिक्षक विचार प्रक्रियेचे मापन करणे हे संशोधकासाठी आव्हानात्मक काम आहे. शिक्षक विचार प्रक्रियेचा प्रभाव शिक्षक वर्तनावर पडतो. वर्तन निश्चिती त्यामुळेच होते. शिक्षक जोपर्यंत शिकवितो तो पर्यंत विचार व कृती यातील संबंध अतूट आहे.

मानव हा विचार करणारा प्राणी आहे त्यामुळेच सर्व प्राण्यात तो श्रेष्ठ आहे. विचार करणे ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. विचार प्रक्रियांत अवबोध, स्मरण, संकल्पना, तर्क, चिकित्सा, कल्पना इत्यादी मानसिक क्रियांचा समावेश होतो. विचार प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी एखादी समस्या असावी लागते. मानव प्राणी केवळ तर्काने विचार करतो. गरज ही विचार प्रक्रियेची जननी आहे.

अध्यापनाच्या संदर्भात शिक्षकाच्या मनात ज्या विचार प्रक्रिया चालतात. त्याचे तीन प्रकार आहेत.

१) शिक्षक नियोजन किंवा पूर्व क्रियात्मक विचार.

२) शिक्षकांचे आंतरक्रियात्मक विचार व निर्णय.

३) शिक्षकाच्या अध्यापन विषयक उपपत्ती व विश्वास.

**शिक्षक नियोजन किंवा पूर्व क्रियात्मक विचार** (Teachers Planning or Preactive thoughts)

शिक्षक पाठनियोजन, घटकनियोजन, दैनंदिन, अल्पकालिन, दीर्घकालीन, साप्ताहिक, सत्र व वार्षिक नियोजन असे भिन्न प्रकारचे नियोजन करत असतात. हे सर्व प्रकार एकमेकांशी निगडित आहेत.

दिलेल्या अभ्यासक्रमात भर घालून, काही भाग वगळून, क्रम बदलून, स्वतःचा स्वतंत्र अर्थ लावून, चुकीचा अर्थ लावून शिक्षक अध्यापनात त्याचे रूपांतर करतात. विविध मुद्यासंदर्भात वेळेची विभागणी, द्यावयाचा वेळ यासंबंधीचे निर्णय शिक्षक नियोजनातच घेतात. शिक्षकाचे नियोजन व अध्यापन यांत घनिष्ट संबंध असतो. नियोजनाच्या विविध शैली दिसून येतात. नियोजनात शिक्षक आशय व विद्यार्थी कृती यांचा विचार अधिक करतो. उद्दिष्टांचा विचार कमी करतो.

**शिक्षकाचे आंतरक्रियात्मक विचार व निर्णय** (Teacher's interactive thoughts and decisions)

अध्यापन करताना शिक्षक प्रामुख्याने विद्यार्थ्यांचाच अधिक विचार करतात. त्यानंतर अध्यापन पद्धती, कौशल्ये, आशय यांचा क्रम लागतो. दुर्दैवाने शिक्षक सर्वात कमी उद्दिष्टांचा विचार करतो.

अध्यापना दरम्यान शिक्षकास स्वत:च्या व विद्यार्थी वर्तनासंबंधात अनेक निर्णय घ्यावे लागतात. सदर निर्णय प्रामुख्याने विद्यार्थी वर्तन, विद्यार्थी प्रतिसाद, विद्यार्थी निवड या विषयीचे असतात. शिक्षकांची वर्गातील आंतरक्रियात्मक निर्णय कृतींची गतिमानता अधिक असते.

शिक्षकाची प्रत्यक्ष वर्गअध्यापनातील आंतरक्रिया समयीची विचार शृंखला व अध्यापन पूर्व-अध्यापनोत्तर विचारशृंखला संपूर्णत: वेगळी असते.

शिक्षकाचा ज्ञानसंग्रह, त्याचा प्रभाव हा त्याच्या नियोजनावर, प्रत्यक्ष आंतरक्रियात्मक कृतीवर पडतो.

**शिक्षक उपपत्ती व विश्वास** (Teacher's theories and beliefs)

शिक्षक स्वत:च्या अनुभवातून, चिंतनातून अध्यापन-शिक्षण याविषयी स्वत:ची मते, सिद्धांत बनवितो हेच त्याचे स्वत:चे अध्यापनविषयक विश्वास (beliefs) होत. या विचारांचा त्यांच्या अध्यापनावर परिणाम होतो.

शिक्षकाच्या स्वत:च्या उपपत्ती कधीच स्थिर नसतात. येणारे अनुभव, त्याच्या अर्थ लावण्याच्या पध्दती यातूनच त्याची पुढील कृती ठरते.

विद्यार्थी यशापयशाविषयी शिक्षकांची मते असतात तशीच अध्यापनविषयकही नियम, प्रतिमा असतात. हे नियम, तत्त्वे, प्रतिमा इ. त्यांच्या चिंतनातून तयार होतात. शिक्षकांची व्यक्त काही तत्त्वे पुढील प्रमाणे - १) भरपाईचे तत्त्व, २) मृदुतेचे तत्त्व, ३) प्रभावशक्तीतील सहभागाचे तत्त्व, ४) प्रगती चाचणी तत्त्व, ५) संयमनाचे तत्त्व, ६) शिक्षक विश्वसनीयतेचे तत्त्व, ७) स्वयंशोधक दृश्यांकनाचे तत्त्व, ८) बोधात्मक अनुबंधाचे तत्त्व, ९) समापनाचे तत्त्व, १०) समान वागणुकीचे तत्त्व.

शिक्षककृती पुष्कळदा भौतिक सुविधा, बाह्य घटकांचा प्रभाव यावर अवलंबून असते. प्राचार्य, शाळा, समाज, अभ्यासक्रम यांचा प्रभाव त्यांच्या कृतीवर होत असतो. शिक्षकांच्या नियोजनात कमी लवचिकता असते कारण काही निर्णय अगोदरच घेतले असतात.

शिक्षकाच्या नियोजनामध्ये Routine चा अत्यंत महत्त्वपूर्ण वाटा आहे. त्यामध्ये निवड, व्यवस्थापन आणि क्रमबद्धता यांना अधिक प्राधान्य आहे. शिक्षकाच्या पाठनियोजनातून त्यांच्या संपूर्ण नियोजनाचे प्रतिबिंब पाहण्यास मदत मिळत नाही.

शिक्षक नियोजनात मुख्यत: १) केवळ वर्गाचे भौतिक व्यवस्थापन, २) विद्यार्थ्यांच्या क्षमतांचे परिक्षण, ३) वर्गाची सामाजिक प्रणाली प्रस्थापित करणे याबाबी दिसतात.

आज शिक्षणाचा दर्जा घसरलेला दिसतो कारण शिक्षक अभ्यासक्रमातून विषयांतर करतो. याची कारणे म्हणजे शिक्षकाचे तुटपुंजे विषयज्ञान, शिक्षक मार्गदर्शिकेमध्ये आवश्यक माहिती उपलब्ध नसणे ही होत. त्याचप्रमाणे अध्यापनातील संकीर्ण व संभ्रामक संकल्पना या बाबीही आहेत. कारण शिक्षक केवळ एकाच प्रकारच्या नियोजनाकडे अधिक लक्ष देतात. शिक्षक प्रशिक्षणात पाठनियोजनावर फार मोठ्या प्रमाणात भर दिला जातो. सर्व प्रकारच्या नियोजनांचे परस्पर संबंध याचा विचार होत नाही.

शिक्षक नियोजनात मूल्यमापनाला फारच कमी महत्त्व देत. बहुतेक शिक्षक शिकविण्याच्या पाठ्यांशावर भर देतात, नंतर अध्यापन प्रक्रियेवर भर देतात. शिक्षक उद्दिष्टांवर मात्र अगदीच कमी वेळ खर्च करतात.

मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये शिक्षकाला अध्यापनापाठोपाठ मूल्यमापन करावे लागते. त्यामुळे अध्यापकास अध्यापनावर वेळ देणे गरजेचे असते. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये उद्दिष्टे निश्चित करून अध्यापन करावे लागते. त्यामुळे त्याचे उद्दिष्टांवर अधिक लक्ष असते. मार्गदर्शक संच पद्धती यामुळेच फायदेशीर आहे.

## ३.५ मार्गदर्शक संचाचे फायदे

१) **काय शिकवायचे तेवढेच शिकविले जाते** अध्यापन करताना सुरवातीला पाठाचे नियोजन केले जाते. प्रत्येक तासिकेचे नियोजन केले जाते. एका तासिकेत किती पाठ्यांशाचे अध्यापन करावे लागेल याचा विचार करून अध्यापन करावे लागते.

२) **अध्यापन केलेल्या पाठ्यांशावरच चाचणी घ्यावी लागते** अध्यापनाच्या तासिकेचे नियोजन केल्यानंतर अध्यापनानंतर द्यावयाची चाचणी तयार करावी लागते. अध्यापनाचे विद्यार्थ्यांनी किती अध्ययन केले आहे हे चाचणी द्वारे पाहता येते. त्यामुळे अध्यापकास आपल्या अध्यापनाची परिणामकारकता तपासता येते.


३) **अध्यापनाची पातळी उंचावते** अध्यापनानंतर विद्यार्थ्यांची अध्ययनक्षमता तपासायची असते त्यामुळे अध्यापक संबंधित पाठ्यांशामध्ये विद्यार्थी कुवत लक्षात घेऊन विविध युक्त्या, साधनांचा वापर, उदाहरणांचा वापर करतो. त्यामुळे अध्यापकाची अध्यापनाची पातळी उंचावते.

४) **विद्यार्थ्यांच्या कुवतीला वाव मिळतो** अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये अध्ययन करताना विद्यार्थी हा चर्चेत सहभागी होतो. मार्गदर्शक संच पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या आंतरक्रियांना प्राधान्य मिळते. त्यामुळे विद्यार्थी कृतीशील, क्रियाशील राहतो. विचार करण्यास प्रवृत्त होतात.

**५) विद्यार्थ्यांचे अवधान अधिककाळ टिकते** मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये पूरक शैक्षणिक साधनांचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे पाठामध्ये विद्यार्थ्यांनाही समाविष्ट करून घेण्यात येते. त्यामुळे अध्ययन करताना त्यांचे अवधान अधिक काळ टिकते.

**६) ज्ञानाची संरचना सुगम बनते** योग्य अध्ययन-अध्यापनामुळे विद्यार्थ्यामध्ये अध्ययन अनुभवाद्वारे अपेक्षित वर्तन बदल घडवून आणणे शक्य होते. अपेक्षित वर्तन बदल घडून आला आहे का ? हे पाहता येते. झालेला बदल किती प्रमाणात झाला हे मूल्यमापन चाचणीद्वारे पाहता येते.

ज्या साधनाद्वारे मूल्यमापन करण्यात येते त्यांना मूल्यमापन साधने म्हणतात. मूल्यमापन प्रक्रिया पुढील आकृतीवरून अधिक स्पष्ट होते.




मूल्यमापन प्रक्रियेमध्ये प्रथम उद्दिष्टे ठरविली जातात. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक ते अध्ययन प्रसंग निर्माण करून अध्ययन अनुभव दिला जातो. यावरून ज्ञानाची संरचना तयार होते व मूलभूत संकल्पना सतत सुरूच ठेवावी लागते. मूल्यमापन प्रक्रिया ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

**७) अध्ययन प्रक्रियेत विविध ज्ञानेंद्रियांचा वापर केला जातो** अध्यापक अध्यापन करताना विविध शैक्षणिक साधनांचा वापर करतो. या विविध साधनांच्या निरनिराळ्या ज्ञानेंद्रियांना चालना मिळते. वेगवेगळ्या संवेदना निर्माण होतात. पाहणे, ऐकणे, निरीक्षणक्षमता, चर्चेत सहभाग, स्वाध्याय सोडविणे इ. मुळे बदल घडून येतात व ज्ञानेंद्रियांना चालना मिळते.

**८) प्रतिमा / संबोध यांचे ठसे स्पष्ट उमटतात** अध्यापनामुळे ज्ञानेंद्रियांना चालना मिळून विद्यार्थ्यांच्या मनपटलावर प्रतिमा, संबोधाचे ठसे, त्याच्या संकल्पना उमटतात. वेगवेगळ्या अध्ययन पद्धतींचा अवलंब केल्याने मनपटलावर उमटणारे संकल्पनेचे ठसे, संबोधाचे ठसे, प्रतिमा स्पष्ट असतात. तीव्र स्वरूपाच्या असतात. त्यामुळेच धारणा व स्मरण योग्य प्रकारे होते.

**९) अध्ययन रसपूर्ण होते** मार्गदर्शक अध्यापन पद्धतीने अध्यापन केल्यामुळे अध्ययन मनोरंजक व रसपूर्ण होते. या पद्धतीमध्ये विद्यार्थी सहभागी होत असल्यामुळे त्यांच्या अध्ययनात अभिरूची वाढते.

**१०) सहज उपलब्ध न होणारे दुर्मिळ अनुभव मिळू शकतात** व्याख्यान पद्धतीमध्ये साधनांचा वापर कमी, मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये साधनांचा वापर अधिक त्यामुळे विद्यार्थ्यास दुर्मिळ अनुभव मिळतात. या पद्धतीमध्ये अध्यापक व्यक्तीगत व सामूहिक स्वरूपाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अध्ययन अनुभव निर्माण करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांस दुर्मिळ असे अनुभव मिळतात.

**११) विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देता येते** अध्यापक विविध साधनांद्वारे अध्ययन अनुभव देत असतात. विद्यार्थी सहभागी होऊन अध्ययन करीत असतो. त्याच पाठ्यांशाच्या शेवटी मूल्यमापन चाचणी घेतल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याचे मूल्यमापन होते. त्यांच्या उणीवा, गरजा लक्षात घेऊन त्यांना प्रत्याभरण देता येते. त्यामुळे मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देता येते. संबंधित विद्यार्थ्यास वैयक्तिक मार्गदर्शन मिळते. प्रगत विद्यार्थ्यांची प्रगती त्याचप्रमाणे अप्रगत विद्यार्थ्यांची प्रगती पाहता येते.

**१२) विद्यार्थ्यांना चर्चेत सहभाग घेता येतो, सहभागी व्हावे लागते** मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये अध्ययन करताना विद्यार्थी यांचा चर्चेत सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. संबंधित पाठ्यांशाच्या दृष्टीने प्रश्न निर्माण करून त्यांची विचार प्रक्रिया सतत चालू राहते. त्यातून अधिक माहिती जमा करण्याची भावना, वृत्ती वाढीस लागते.

**१३) मूल्यमापन चाचणीवरून पाठ्यांशाची आकलन क्षमता समजते** अध्यापनानंतर लगेच पाठ्यांशावर आधारीत मूल्यमापन चाचणी देऊन विद्यार्थ्यांची संबंधित पाठ्यांशाची आकलनक्षमता तपासता येते. संबंधित पाठ्यांशाच्या अधिक प्राविण्यासाठी प्रयत्नशील राहता येते.

**१४) नैदानिक व उपचार पद्धतींचा वापर करता येतो** पाठ्यांशाच्या अध्यापनानंतरच्या चाचणीवरून असे लक्षात आले की संबंधित पाठ्यांश विद्यार्थ्यांना अजिबात आकलन झाला नाही अशावेळी संबंधित पाठ्यांशाचे प्रत्याभरण देऊन, उपचार करून पुन्हा चाचणी धेता येते.

**१५) अभ्यासक्रमाचे नियोजन करता येते** मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये अध्यापनानंतर लगेच चाचणी घ्यावी लागते त्यामुळे घटक शिकविण्यापूर्वीच चाचण्या तयार ठेवाव्या लागतात. त्याचप्रमाणे लागणारी साधने, द्यावयाचे अध्ययन अनुभव यांचेही नियोजन करावे लागते. त्यामुळे साहजिकच अभ्यासक्रमाचे नियोजन करावे लागते.

**१६) मार्गदर्शक संच पद्धती कोणत्याही विषयाला वापरता येते** मार्गदर्शक संच पद्धतीतील वैशिष्ट्यांमुळे ही पद्धती सर्वच विषयाला वापरता येणे शक्य आहे. या पद्धतीच्या वापरामुळे विद्यार्थी सतत अध्ययनक्षम राहतो. त्यास अध्ययनाची सवय लागते. त्यामुळे सदरची पद्धती सर्व विषयांना वापरता येते.

अशा प्रकारे फायदे मार्गदर्शक संच पद्धतीने अध्यापन केल्यास होतात.

## ३.६ मार्गदर्शक संच पद्धती मर्यादा

१) मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये अध्यापनाचे पूर्वनियोजन करावे लागते असे नियोजन अध्यापक करतील असे नाही.

२) मिळालेल्या तासिकेतील ७०% भाग अध्यापन व ३०% भाग चाचणी असे नियोजन केल्यास प्रत्येकवेळी वेळेचे नियोजन करणे कठीण होते.

३) मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये विद्यार्थी सहभाग, अध्ययन अनुभव देणारी विविध साधने यामुळे अध्यापकास अधिक तयारी करावी लागते.

४) अध्यापनाचे पूर्वनियोजन, मूल्यमापन, आधार साहित्य जमा करण्यासाठी अध्यापकास कष्ट पडतात. कदाचित यामुळे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती वाढेल.

५) मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये अध्यापनाच्या तासिकेत पाठ्यांशाच्या अध्यापनानंतर मूल्यमापन चाचणी घ्यावीच लागते.

६) प्रत्येक पाठ्यांशाला सर्व समावेशक व सर्व उद्दिष्टांनुरूप अशी चाचणी तयार करता येईलच असे नाही.

७) पाठ्यांश शिकविल्यानंतर तो भाग लगेच येईल असे नाही.

८) मूल्यमापन चाचणीमध्ये वस्तूनिष्ठ प्रश्नांचा समावेश असल्याने विद्यार्थी अंदाजे उत्तर लिहू शकतो.

९) पाठ्यांश शिकविल्यानंतर लगेच चाचणी होते हे लक्षात येताच विद्यार्थी काही भागच लक्षात ठेवतील.

१०) मूल्यमापन चाचणीमधील प्रगती शेवटपर्यंत राहीलच असे नाही.

११) काही कारणांमुळे तासिकांमध्ये बदल झाल्यास अभ्यासक्रम पूर्ण करणे कठीण होते.

## ३.७ पारंपारिक व्याख्यान पद्धती

शिक्षण ही अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आहे. अध्यापनासाठी अनेक पद्धतींचा वापर केला जातो. आजकाल सर्वच ठिकाणी व्याख्यान पद्धतीचा अध्यापनासाठी वापर केला जातो. इतर पद्धतीचा वापर न करता एकमेव सर्वस्तरीय व्याख्यान पद्धतीचा वापर केला जातो.

पारंपारिक म्हणूनच व्याख्यान पद्धतीचा अध्यापनात वापर केला जातो. व्याख्यान पद्धतीत अध्यापन उद्दिष्टाधिष्ठित असते तर माध्यम पाठ्यांश आहे. अध्यापन गतीशील असेल तर पाठ्यांश जिवंत, रोचक होतो. अध्यापन पद्धतीची निवड करताना विद्यार्थ्यांच्या बौद्धिक पातळी, कुवत, सामाजिक परिसर, वर्ग इ. चा विचार करावा. परंतु आज वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे महाविद्यालयात व्याख्यान पद्धतीचा वापर करावा लागतो.

व्याख्यान पद्धतीमध्ये दृक-श्राव्य साधनांचा वापर न करता अध्यापन करता येते. मुद्देसूद व तर्कशुद्ध, योग्य टप्प्यांचा वापर करता येतो. त्याचबरोबर मुद्द्यांची पुनरावृत्ती, गोषवारा याद्वारेही व्याख्यान देता येते. अध्यापना दरम्यान नोट्स देता येतात त्याचप्रमाणे विद्यार्थी अनाकलनीय टिपणेही घेतात. परंतु व्याख्यान पद्धतीमध्ये विद्यार्थी स्वयंअध्ययनापासून वंचित होतात. व्याख्यान पद्धतीमुळे त्यांना साचेबंद ज्ञानच मिळते. विद्यार्थी बाजारातील उपलब्ध नोट्सचा वापर करतात. त्यामुळे क्रमिक पुस्तके, संदर्भ पुस्तके, ग्रंथालयाचा वापर करत नाहीत. विद्यार्थ्यांचा ऐन उमेदीचा काळ महाविद्यालयात जात असतो. या काळातच तो नोट्सचा वापर करून परीक्षेपुरतेच मर्यादित ज्ञान मिळवित असतो. व आपला ऐन उमेदीचा काळ ज्ञानाविना वाया घालवित असतो. विद्यार्थी बाजारातील नोट्स वापरत असल्याने अध्यापकही चैतन्यप्रदान रहात नाहीत. त्यामुळे जो ज्ञान देण्याचा वसा घेतलेला असतो त्यास उतरती कळा लागते व विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानज्योत पेटविण्यासाठी असमर्थ ठरतो.

''व्याख्यान म्हणजे भाषण नव्हे तर विवेचन, स्पष्टीकरण किंवा समजावून सांगणे होय.''

"Lecture is a carefully prepared oral presentation of subject by an expert in the perticular field."

### अध्यापनात व्याख्यानाचा वापर

व्याख्यान पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा, पाठ्यांशाचे स्पष्टीकरण व पूनरावलोकन करता येते. अध्यापनामध्ये पाठ्यांशाचा, विषयाचा विस्तार पाहिजे तेवढा करता येतो. त्यामुळे वेळेची बचत होते. व्याख्यान

पद्धतीच्या अध्यापनामध्ये एकमार्गी विचार मांडता येतात. त्यामुळे ही पद्धती शिक्षक केंद्रित झालेली आहे. अध्यापकास अभ्यासक्रमानुसार अध्यापन करावे लागते. त्यामुळे त्यास अभ्यासक्रमाचे नियोजन करावे लागते.

**अभ्यासक्रमाचे नियोजन** अध्यापकास अध्यापन करताना प्रथम अभ्यासक्रम पहावा लागतो. त्यातील पाठ्यांश पाहून अध्यापकास त्या अभ्यासक्रमाचे नियोजन करावे लागते. अभ्यासक्रमाचे नियोजन करताना त्यास वर्षभरामध्ये उपलब्ध तासिकांचा विचार करावा लागतो. त्यानंतर संबधित पाठ्यांशासाठी किती तासिका हव्यात याचा विचार करून त्यास पाठ्यांशासाठी योग्य न्याय द्यावा लागतो. त्यामुळे अभ्यासक्रमाचे नियोजन वर्षारंभी करावे अन्यथा घाईघाईने अभ्यासक्रम संपवावा लागतो.

**व्याख्यानाची तयारी** वर्गात जाण्यापूर्वी किंवा अध्ययन करण्यापूर्वी अध्यापकाला तयारी करावी लागते. आज कोणत्या पाठ्यांशाचे अध्यापन करावयाचे आहे हे पाहिल्या शिवाय अध्यापक आत्मविश्वासाने अध्यापन करू शकत नाही. व्याख्यानापूर्वी कोणता पाठ्यांश शिकवायचा आहे. त्या पाठ्यांशाची उद्दिष्टे कोणती, त्यासाठी आवश्यक साधने कोणती, संदर्भ पुस्तके कोणती इ. बाबी पाहणे गरजेचे आहे. एखादा पाठ्यांश समजण्यास कठीण असेल तर त्यासाठी अधिक वेळ द्यावा. अध्यापना दरम्यान फलक लेखन कोणते करायचे याचेही नियोजन करणे भाग असते. व्याख्यानाची तयारी असेल तर अध्यापकाचे अध्यापन योग्य दिशेने होते. व्याख्यानासाठी, अध्यापनासाठी सर्वसाधारणपणे ठराविक पायऱ्यांचा विचार केला जातो.

## ३.८ वर्गाध्यापनाच्या पायऱ्या

अ) प्रस्तावना.

ब) विषय प्रतिपादन - प्रश्नांचा वापर व प्रबलीकरण.

क) समारोप.

**अ) प्रस्तावना** तासिकेमध्ये चाललेल्या पाठ्यांशाचे त्यातील घटकांचे पडसाद विद्यार्थ्यांच्या मनावर उमटत असतात. नविन तासिका सुरू होईपर्यंत ते पडसाद तसेच असतात. त्यामुळे नविन विषयाचे अध्यापन केल्यास त्यासाठी तो विद्यार्थी अध्ययनास तयार नसतो. त्याच्या मनावरील हे पडसाद दूर करून त्यास नविन तासिकेच्या पाठ्यांशाकडे आकृष्ट करणे गरजेचे असते. त्याचे मन नविन विषयाकडे आणणे गरजेचे असते म्हणूनच प्रस्तावना करावी लागते.

प्रस्तावना करण्यासाठी किंवा प्रस्तावनेसाठी अनावश्यक वेळ घालवू नये काही वेळा प्रस्तावना ही तासभर चालते. गरजेनुसार प्रस्तावना करणे गरजेचे आहे. प्रस्तावना विद्यार्थ्यांचे मन नवीन विषयाकडे आकृष्ट करण्यासाठी असते. त्यामुळे प्रस्तावनेमध्ये इतर घटक आणू नयेत.

**ब) विषय प्रतिपादन** व्याख्यानाचा खरा गाभा म्हणजे विषय प्रतिपादन होय. अध्यापकाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा भाग होय. विषय मांडणी, उत्तम कौशल्य यामुळे अध्यापन परिणामकारक होते. विषयाचे प्रतिपादन हे सुलभ, ओघवते, सुस्पष्ट असावे. त्यामुळे आकलनशक्ती व उपयोजन कौशल्य वाढविण्यास मदत होते. पाठ्यांशातील विषय व आशय हा विद्यार्थ्यांच्या आवाक्यातील असावा. शिक्षकाने विद्यार्थी स्तर, त्यांची आकलन पातळी यांचे भान अध्यापना दरम्यान ठेवले पाहिजे. विषय प्रतिपादनादरम्यान आशय बिनचूक असावा. त्या आशयाचे लहान लहान विभाग करून त्यांची तर्कशुद्ध मांडणी करावी. त्यांच्यामध्ये क्रमबद्धता असावी. विषय प्रतिपादन करताना संबंधित विषयाचेच विवेचन करावे. त्यासाठी विविध संदर्भ द्यावेत. विषय प्रतिपादनामध्ये प्रमुख तत्त्व, संकल्पना, व्याख्या इ. चा वापर करून पाठ्यांशाचे स्पष्टीकरण करावे. त्यामध्ये उदाहरणांचा वापर करावा. त्यामुळे त्या पाठ्यांशाचे आकलन सुलभ होते.

व्याख्यान पद्धतीने अध्यापन करताना अनावश्यक हालचाली, शैक्षणिक साधनांचा वापर, विषयांतर, पाल्हाळ इ. टाळावे. व्याख्यान पद्धतीने अध्यापन करताना मुद्द्यांची गफलत न करता सविस्तर मुद्द्याची चर्चा करावी, प्रश्नांचा अनावश्यक वापर टाळावा, फलकलेखन जास्त, अशुद्ध करू नये, त्याचप्रमाणे आकृत्या काढू नयेत, अध्यापन करताना आवाज एकसुरी असावा, उभे राहण्याची पद्धती योग्य असावी, वरील बाबी लक्षपूर्वक व्याख्यानाच्या वेळी घडून आल्या पाहिजेत.

वर्ग अध्यापन करताना अध्यापकाला अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो.

१) ज्ञानाकडून अज्ञानाकडे
२) सोप्याकडून कठिणाकडे
३) मूर्ताकडून अमूर्ताकडे
४) पूर्णाकडून अपूर्णाकडे
५) विशिष्टाकडून सामान्याकडे
६) सुलभ गोष्टीकडून गुंतागुंतीकडे

या गोष्टींचा विचार करून अध्यापकास अध्यापन करावे लागते.

विषय प्रतिपादन करताना काही महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष देणे अतिशय महत्त्वाचे असते. त्या बाबी पुढील प्रमाणे -

**प्रश्नांचा वापर** विषय प्रतिपादन करताना विद्यार्थ्यांचे अवधान टिकविण्यासाठी, नवीन ज्ञानाची सांगड घालण्यासाठी, पूर्वज्ञान जागृत करण्यासाठी, व्याख्यानाची परिणामकारकता अजमाविण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या विचारांना प्रेरणा देण्यासाठी प्रश्न विचारावे लागतात किंवा प्रश्न विचारावेत. साधारणपणे व्याख्यान पद्धतीमध्ये उपघटकांनुसार प्रश्न निर्माण करता येतात. ५ ते ६ प्रश्न सहजपणे उपस्थित करता येतात.

व्याख्यान पद्धतीमध्ये पाठ्यांशाचे विवेचन, स्पष्टीकरण करताना सतत प्रश्न विचारता येत नाहीत अन्यथा पाठ्यांशाचा भाग पूर्ण होणार नाही. प्रश्नच विचारू नयेत असेही नाही तसे केल्यास विद्यार्थ्यांमध्ये पाठ्यांशाचे आकलन झाले कि नाही हे समजत नाही, विद्यार्थ्यांचे अवधान टिकविण्यात अयशस्वी होऊ, विद्यार्थ्यांच्या शंका त्यांच्याजवळच राहतील व विद्यार्थी संबंधित विषयाकडे कानाडोळा करतील. त्यामुळेच व्याख्याना दरम्यान थोडे प्रश्न विचारून व्याख्याने प्रभावी करावीत.

व्याख्यानामध्ये प्रश्न उपस्थित केल्यावर विद्यार्थी त्यावर उत्तर देतील. उत्तरातील सत्यतेवर त्यास योग्य प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरास प्रतिसाद न मिळाल्यास ते नाराज होतात. व पुढील वेळी ते व्याख्यानामध्ये सामील होत नाहीत. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन द्यावे म्हणजेच अध्यापकाने प्रबलीकरणाचा वापर करावा.

**प्रबलीकरण** (Reinforcement)

अध्यापकाची स्वाभाविक प्रतिक्रया म्हणजे प्रबलीकरण. अध्यापकाचे अध्यापन सुरू असताना विद्यार्थी पाठ्यांशाचे अध्ययन करीत असतात. अध्यापना दरम्यान अध्यापक विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारतात. काही प्रश्न निर्माण करतात. अशा वेळी अध्ययनकर्ता विद्यार्थी त्या प्रश्नांचे समाधान करण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नांना अध्यापकाने दाद दिली पाहिजे ती शाब्दिक, अशाब्दिक, होकारार्थी, नकारार्थी अशी असावी. परंतु ती दाद देताना त्यामध्ये सहजता असावी. या सहज दाद देण्याच्या कृतीमधून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते त्यांच्यामध्ये उत्साह वाढतो.

प्रबलन देताना त्यामध्ये अतिरेक नसावा. त्याचप्रमाणे प्रबलन देताना ते नाटकी नसावे. प्रबलन देताना एकाच शब्दाचा वापर टाळावा. प्रबलनांचा वापर केल्यास विद्यार्थी पाठामध्ये सहभागी होतात व त्यामुळे अध्यापन चांगले होते.

**क) समारोप** अध्यापकाने अध्यापनामध्ये वरील मुद्द्यांचा समावेश केला असला तरी शेवटी त्यातील प्रमुख पाठ्यांश मुद्द्यांचा उजाळा दिल्याशिवाय त्याला अध्यापनाचा आनंद मिळत नाही. म्हणजेच पाठाच्या

शेवटी पाठ्यांशातील मुद्द्यांना उजाळा देऊन झालेला भाग पुन्हा थोडक्यात सांगून अध्यापन प्रभावी करतो. म्हणजे व्याख्यानामध्ये व्याख्यानाचा शेवट समारोपाने करावा.

समारोपामध्ये अध्यापक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून झालेला पाठ्यांश विचारू शकतात. समारोप हा त्या पाठ्यांशाचा शेवट असावा. त्याचप्रमाणे त्या व्याख्यानाच्या शेवटी असावा. समारोप न करताच पाठ्यांशाचा शेवट किंवा व्याख्यानाचा शेवट करू नये.

व्याख्यान पद्धतीमध्ये अध्यापकाला अनेक गोष्टी टाळाव्या लागतात. या गोष्टी टाळल्यास अध्यापकाचे व्याख्यान आदर्श होऊ शकते.

१) व्याख्याना दरम्यान जास्त टिपणे देणे.

२) व्याख्यानात पुस्तकातील किंवा वहीतील भाग वाचणे.

३) विषयांतर करणे.

४) एकाच सुरात व्याख्यान देणे.

५) सतत प्रश्न विचारणे.

६) प्रायोगिक भागात व्याख्यानाचा वापर.

७) एखाद्या पाठ्यांशावर जास्त भर देणे.

आज अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये व्याख्यान पद्धतीचाच वापर केला जातो. अध्यापकाने वरील गोष्टी टाळल्यास त्याचे व्याख्यान निश्चितच आदर्श ठरू शकते.

## ३.९ मार्गदर्शक संच पद्धती व व्याख्यान पद्धती तुलना

१) व्याख्यान पद्धतीचा वापर जुना आहे. मार्गदर्शक संच पद्धत ही इतर पद्धतीपेक्षा नाविन्यपूर्ण आहे.

२) व्याख्यान पद्धत ही पारंपारिक पद्धत म्हणून वापरतात. मार्गदर्शक संच पद्धत ही नवीन पद्धत आहे.

३) व्याख्यान पद्धतीमध्ये प्रस्तावना, हेतूकथन, विषयविवेचन, समारोप या पायऱ्यांचा समावेश असतो. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये अध्यापनपूर्व, प्रत्यक्ष अध्यापन, अध्यापनोत्तर अशा पायऱ्यांचा समावेश होतो.

४) व्याख्यान पद्धतीमध्ये अध्यापक हा केंद्रबिंदू असतो. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये शिक्षक व विद्यार्थी दोघेही केंद्रबिंदू असतात.

५) व्याख्यान पद्धतीमध्ये अध्यापक अध्यापन करीत असताना विद्यार्थी ऐकण्याची भूमिका घेतात.

मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये अध्यापक अध्यापन करताना अध्यापक-विद्यार्थी यांमध्ये चर्चात्मक अध्यापन घडून येते. म्हणजे अध्यापक व विद्यार्थी यांची त्यात भूमिका असते.

६) व्याख्यान पद्धतीमध्ये विद्यार्थी पाठात सहभागी होत नसल्याने त्यांच्या प्रतिक्रिया मिळत नाहीत. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये विद्यार्थी प्रतिक्रियांचा विचार करावा लागतो.

७) व्याख्यान पद्धतीमध्ये अध्यापकास अध्यापना दरम्यान विचार बदलावे लागत नाहीत. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये विद्यार्थी चर्चेनुसार, प्रसंगानुसार अध्यापकास विचार बदलावे लागतात.

८) व्याख्यान पद्धतीमध्ये विद्यार्थी कृतीशील राहतीलच असे नाही. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये विद्यार्थी कृतीशील राहतात.

९) व्याख्यान पद्धतीच्या अध्यापनामध्ये विद्यार्थी वर्गात असतोच असे नाही. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये विद्यार्थी वर्गात असणे गरजेचे असते.

१०) व्याख्यान पद्धतीमध्ये विद्यार्थी स्वयंअध्ययन करत नाही. संदर्भ पुस्तके मिळवित नाही. बाजारात मिळणाऱ्या नोट्सचा वापर करतो. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये विद्यार्थी स्वयंअध्ययन करीत असतो. संदर्भ पुस्तकांचा वापर करतो.

११) व्याख्यान पद्धतीमध्ये विद्यार्थी अध्यापकावर अवलंबून असतात. तो स्वत: जास्त प्रयत्न करीत नाही. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये अध्ययनाची जबाबदारी विद्यार्थ्यांवर असते.

१२) व्याख्यान पद्धतीतील तासिकेमध्ये किती शिकवावे याची निश्चिती नसते. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये तासिकेतील पाठ्यांशाचे नियोजन असते.

१३) व्याख्यान पद्धतीमध्ये घटक चाचणी घेतली जाते. परंतु मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये तासिकेतील पाठ्यांशांनंतर लगेच मूल्यमापन होते.

१४) व्याख्यान पद्धतीमध्ये मूल्यमापन प्रक्रिया उशिरा होते. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये मूल्यमापन प्रक्रिया लगेच होत असल्याने प्रत्याभरण लगेच देता येते.

१५) व्याख्यान पद्धतीमध्ये मूल्यमापन लगेच नसल्यामुळे विद्यार्थी अध्यापनामध्ये सक्रिय होत नाही. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये लगेच मूल्यमापन होते याची जाणीव असल्यामुळे विद्यार्थी अध्यापनामध्ये सक्रिय होतात.

१६) व्याख्यान पद्धतीत विद्यार्थी चर्चेमध्ये सामील न होता फक्त ऐकण्याची क्रिया करतात. त्यामुळे ते विचार करत नाहीत. मार्गदर्शक संच पद्धतीमध्ये विद्यार्थी चर्चेत सहभागी होत असल्यामुळे विचारपूर्वक बोलतात. त्यामुळे त्यांची वैचारिक पातळी वाढते, वाढविता येते.

यासर्व विविधतेमुळेच मार्गदर्शक संच पद्धती ही इतर पद्धतींपेक्षा वेगळी वाटते.